# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६६ /२०२४ — दि.०६/०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. रचना कन्स्ट्रक्शन लि. यांचे वतीने दि. ०७/०४/२०२४ रोजी मुंबई–नाशिक महामार्गावर लोढा ब्रिज उतरणीचे पुढे पादचारी पुलाचा स्टील गर्डर क्रेनच्या सहाय्याने ठेवण्यात येणार आहे. सदर स्टील गर्डर ठेवतेवेळी मुंबई कडून नाशिक कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करावी लागणार आहे. सदर वेळी घोडबंदर कडून नाशिक कडे तसेच मुंबई कडून नाशिक कडे जाणारी जड अवजड व हलकी वाहने पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई कडून माजिवडा उड्डाणपुलावरून नाशिक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ज्युपीटर वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुंबई घोडबंदर उड्डाणपुलावरून सरळ जावून कॅपिटल हॉटेल समोरील ब्रिज उतरणीवरून खाली येवून कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून बाळकुम नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ज्युपीटर हॉस्पिटल समोरील स्लीप रोडने गोल्डन क्रॉस मार्गे नाशिक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गोल्डन क्रॉस** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कॅपिटल हॉटेल समोरून सरळ जावून कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून बाळकुम नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) घोडबंदर उड्डाणपुलावरून नाशिक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्रॉडवे पेट्रोल पंपासमोरील ब्रिज चढणी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ब्रॉडवे पेट्रोल पंपासमोरील स्लीप रोडने सरळ जावून कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून बाळकुम नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) घोडबंदर उड्डाणपुलावरून मुंब्रा मार्गे जे.एन.पी.टी. कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा समोरील उड्डाणपुलावरील यु टर्न** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सरळ जावून ऐरोली मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०७/०४/२०२३ रोजी रात्रौ ०१:०० ते ०४.०० वाजेपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.